# दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, स.नं. १३२/बी, आयसीएस कॉलनी,
युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७. फोन : ०२०-६७०८ ६७०८

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (केवळ सभासदांकरिता)

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. च्या सभासदांची ११६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार दि. २७ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता शिवशंकर सभागृह, स.नं. ६९८/१, महर्षीनगर, पायगुडे बाग, पुणे-४११०३७** येथे होणार आहे. त्यावेळी पुढील कामकाज होईल. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**१.** दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या ११५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा आणि दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

**२.** अ) पुढील प्रस्तावांचा विचार करणे व त्यास मान्यता देणे.

१. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा वार्षिक वृत्तान्त.

२. दि. ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचे नफातोटा पत्रक.

३. दि. ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद.

ब) सन २०२१-२०२२ या वर्षातील गंगाजळी व इतर निधींच्या प्रत्यक्ष वापरासंबंधी माहिती घेणे.

**३.** संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२१-२२ च्या नफा विभागणीसंबंधी विचार करणे व त्यास मान्यता देणे.

**४.** सन २०२१-२०२२ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व त्याच्या पूर्तता अहवालाची माहिती घेणे.

**५.** रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे. त्यांचे मानधन ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.

**६.** बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात येणे बाकी असलेल्या कर्जांची माहिती घेणे. (मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट २००२ कलम ३९ (३) अनुसार).

**७.** ११६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती मान्य करणे.

**८.** मा. अध्यक्ष यांच्या संमतीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून

**दिनांक :** ०१ सप्टेंबर २०२२
**ठिकाण :** पुणे (महाराष्ट्र)

**सौ. अपेक्षिता ठिपसे**
**व्यवस्थापकीय संचालिका**

## सूचना

**१.** वरील सभेस सकाळी ठीक ९.०० वाजता प्रारंभ होईल. त्यासाठी आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नसेल तर ही सभा स्थगित केली जाईल. अशा स्थगित सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ९.३० वाजता सुरू होईल व या स्थगित सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही. या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

**२.** दि. २७ सप्टेंबर २०२२ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या मुख्य कार्यालयात दि. २३ सप्टेंबर २०२२ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत पहावयास मिळतील.

**३.** वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी स्वरूपात बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये दि. २३ सप्टेंबर २०२२ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत आणून द्यावेत, ही विनंती.

**४.** बँकेचा संपूर्ण अहवाल बँकेच्या संकेत स्थळावर **www.cosmosbank.com** उपलब्ध असून सभासदांसाठी अहवालांच्या प्रती बँकेच्या शाखांकडेही उपलब्ध करून देण्यात येतील. सभेपूर्वी जे सभासद संपूर्ण अहवाल मिळण्याची लेखी मागणी करतील त्यांना बँकेचा संपूर्ण अहवाल बँकेकडे नोंदविलेल्या त्यांच्या पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात येईल.

**५.** सभेस येताना सभासद ओळखपत्र कृपया जरूर सोबत आणावे.